# प्रेस नोट

# पोलीस आयुक्तालय

## अमरावती शहर

**दिनांक ०५/०१/२०२३**

१.  पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा - ठिकाणी फिर्यादी कु.शिल्पा आनंदराव गडलिंग वय ३५ ३५ वर्ष,धंदा- नौकरि(अधिक्षक),रा. छत्रसाल नगर व्ही.एम.व्हि कॉलेजच्या मागे अमरावती हे होस्टेलला हजर असतांना दि ०३/०१/२०२३ यातील नमुद मुलगी वय १६ वर्षे रा यवतमाळ ही सकाळी ११.३० वा सुमरास तक्षशिला कॉलेज मध्ये जाते म्हणुन रजि. ला नोंद करुन निघुन गेली परंतु ती साय ०६.०० वा पोवतो हॉस्टेलला परत आली नाही म्हणुन तीचा आतापावेतो शोध घेतला मिळुन आली नाही ती ला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेले अशा फिर्यादीने दिलेल्या जबानी रिपोर्ट वरुन दि ०४/०१/२०२३ चे ०१.२१ वा दरम्यान सदरचा गुन्हा दाखल केला.

२.  पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा - यातील फिर्यादी गजराज शंकर यादव वय ४६ वर्षे, रा रेडीयंट हॉस्पीटल मागे सबणीसप्लॉट अमरावती हे नमुद आरोपी १)प्रज्वल गणेशराव काठगडे, २) आदित्य गणेशराव काठगडे दोन्ही रा. कल्याण नगर अमरावतीहे नेहमी मोती नगर चौकात बसत सल्याने त्यांना चांगल्याने ओळखतात दि. ०४.०१.२०२३ चे १३.०० वा फिर्यादी हे मोतीनगर चौक अमरावती येथे नाश्ता करण्या करिता गेले असता नमुद आरोपी क्र. ०१ व ०२ हे दारु पिवुन चौकात शिवीगाळ करत असतांना फिर्यादी यांना आरोपी क्र.०१ ला म्हटले की तु कोणाला शिवीगाळ करत आहे असे म्हटले असता आरोपी ने म्हटले की, तुला शिवीगाळ केली नाही त्यामुळे फिर्यादी हे घरी मोटरसायकल ने घरी जात असतांना आरोपी क्र.०१ याने लोखंडी पाईपाने व ०२ यांनी हाता बुक्याने मारहाण करुन शिवीगाळ केली असता फिर्यादीच्या खिशातील ७,०००/-रु. झचापटीत खाली पडले व मोबाईलचे नुकसान झाले अशा फिर्यादी जबाणि रिपोर्ट वरुन दि.०४.०१.२०२३ चे १८.५९ वा सदरचा गुन्हा दाखल केला.

३. पोलीस स्टेशन नांदगांव पेठ - यातील फिर्यादी दिनेश श्रीकृष्ण वडाने वय ३४ वर्षे रा. स्वामी समर्थ नगर रहाटगाव अमरावती यांनी दि ०१/१२/२०२२ रोजी फोन पे वरुन ५७०० रुपये चा व्यवहार केला पण तो व्यवहार पुर्ण झाला नाही परंतु फि च्या खात्यावरुन ५७०० रुपये ची रक्कम कपात झाली दि ३/०१/२०२३ चे १३/३० वा फि नी गुगल वरुन फोन पे कस्टमर केअर क्र ०९५३२६४२९०४ या क्र.वर संवाद केला असता फि ला ८२५००५८६९० क्र. वरुन कॉल आला आणी फि चे पैसे वापस आणण्या करिता एनी डेक्स अँप डाउनलोड करायला लावले फि ने अँप डाउनलोड केल्या नंतर फि चे खात्यातील ५३२२८ एवढी रक्कम कपात झाली त्या नंतर फि च्या लक्षात आल्या नंतर त्यांनी तक्रार केली ०४/०१/२३ चे १९.३७ वा सदरचा गुन्हा दाखल केला.

४. पोलीस स्टैशन गाडगेनगर - यातील फिर्यादी महिला वय ७२ वर्षे या दि ०४-०१-२०२३ चे १६-०० वा दरम्यान त्यांचे मोहल्या शेजारील शोभा नगर मध्ये नागोबा मंदीरामध्ये सप्ताह चा कार्यक्रम सुरु असल्याने त्या भागवत कार्यक्रमाकरीता गेले. भागवता संपल्यावर प्रसाद घेतेवेळी तेथे बरीच महीलांची गर्दी होती प्रसाद घेवून बाहेर आल्यावर काही अंतरावर घराचे दिशेने गेली असता त्यांचे लक्षात आले की, त्यांचे गळयाती मिनी मंगळसुत्र वजन अं. १५ ग्रॅम किं.अं. २५,०००/- रु दिसून आले नाही म्हणून त्या परत भागवत चे ठीकाणी गेले व तेथे सांगितले की, माझे मंगळसुत्र चोरीस गेले आहे तर त्या ठीकाणी आशा देशमुख यांनी सुध्दा सांगितले की, त्यांचे १५ ग्रॅम चे मिनी मंगळसुत्र सोन्याचे पट्टीचे व छोटे डोरले असलेली किं अं २८,०००/- रु चे व शिवनगर मध्ये राहणारे केसरबाई यशवंत खेगरे यांचे मंगळसुत्र दोन पदरी मण्याचे त्यामध्ये लॉकेट गोवलेले दोन छोटेडोरले असलेली वजन अंदाजे ०८ ग्रॅम वे किं अं १७,०००/- रु चे गर्दीमध्ये कोणीतरी अज्ञात महीलेने हातसफाई करुन एकुण ७०,०००/- चे दागीने चोरुन नेले .अश्या फि चे जबाणी रिपोर्ट वरुन ०४-०१-२०२३ चे २१-०८ वा सदरचा गुन्हा दाखल केला.

५. पोलीस स्टैशन गाडगेनगर - यातील फिर्यादी महिला वय ३० वर्षे रा. लक्ष्मी नगर अमरावती दि ०२.०१.२०२३ रोजी रात्री ०७.०० वा तिची मुलगी इशीका व मुलगा प्रज्वल असे तिघे जण मुलीकरीता मेडीकल मधून गोळया आणण्याकरीता जात असता लंकेश गजभीये याने फीचा पाठलाग करीत फीला शिवीगाळ करीत कॉटन मार्केट पर्यंत आला व त्याने फीचा हात पकडून रस्त्यात अडवीले व माझा मोबाईल परत कर नाहीतर तुला व तुझे मुलीला चाकू मारतो अशी धमकी दिली त्यावेळी त्या ठीकाणी ऑटो चालक फीचे ओळखीचे संजय कोटे हे आल्याने तेथून बघून घेण्याची धमकी देत तो निघून गेला तसेच मी नागपूर ला जात आहे दोन दिवसांनी परत आल्यावर मोबाईल लागेल अशी धमकी दिली. आज दि ०४.०१.२०२३ रोजी दुपारी ०२.३० वा वा फी चे मोबाईल वर त्याचे मोबाईल वरून तिन वेळा फोन करुन फोनची मागणी करीत मी तुझे घराजवळ उभा आहे व फोन परत केला नाही तर मला काय करायचे ते करतो अशी धमकी दिली..अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन दि ०४-०१-२०२३ वा चे २१-३७ वा सदरचा गुन्हा दाखल केला.

६. पोलीस स्टैशन वलगांव - यातील फिर्यादी कैलास साहेबराव चापके वय ३४ वर्ष रा.पुर्णा नगर ता.भातकुली. जि.अमरावती याचे शेतात बोअर असुन दि०३/०१/२०२३ चे १८/०० वा ते ०४/०१/२०२३ चे ०८/०० वा.दरम्यान त्या बोअर फिर्यादी हा मक्रमपुर शेत शिवार यथील त्याचे शेतात व शेजारचे शेतात शेतीला फिर्यादीचे बोअर ने पाणी देत असतांना फिर्यादी यांचे शेत शेजारी नामे राहुल पंजाबराव सुखदान वय ३४ वर्ष यांचे शेतात पिकाला पाणी देण्या साठी त्यांनी फिर्यादीचे बोअर वरुन ५० प्लास्टीक पाईप काळ्या रंगाचे व त्यावर १० पितळी नोझल सिप लावुन गेले असता.दुस-या दिवशी राहुल पंजाबराव सुखदाने हे शेतात पाणी देण्या साठी गेले असता.त्यांना बोअर चालु करण्याची पेटी त्यामध्ये स्टार्टर ,मेन स्विच ,ऑंटो स्विच सर्विस केबल जुनी वापरती कोणत्या तरी अज्ञात चोराने चोरुन नेली.तसेच १० प्लास्टीक पाईप व पितळी १० नोझल स्पिक्लर चे तोडुन फोडुन नुकसान केले.एक जुनी वापरती एक जुनी वापरती पेटी किअ.४५००/रु व ५० प्लास्टीक पाईप कि.अ.१७,०००/रु व १० पितळी नोझल कि.अ.३५००/रु चे नुकसान केले.अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन दि.०४/०१/२०२३ चे १७/३१ वा सदर चा गुन्हा दाखल केला.

७. पोलीस स्टेशन राजापेठ - फिर्यादी निशांत संजय अद्रवाल वय १९ वर्षे रा. निरज अग्रवाल तत्वज्ञान मंदिराजवळ दरोगा प्लॉंट अमरावती हा आपली मोटर सायकल MH ३० AG३०६ फँशन प्रो व्हाईट कलरची चेचिस नं. MBLHA१०AWCGF२८२८९ इंजिन नं. HALOENCGF७१२७२ कि. अं. २०,०००/- रू. दि ४/१/२३ चे२०.०० वा. २०.३० वा दरम्यान फरशी स्टॉप HDFC ATM समोर अमरावती येथे ठेउन चहा पिण्याकरिता गेला व परत चहा पिवुन आले तर ठेवलेल्या ठिकाणी गाडी दिसुन आली नाही ती कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली. अशा फि चे जबानी रिपोर्ट वरुन दि ०४/०१/२३ टे २३.०९ वा सदरचा गुन्हा दाखल केला.

८. पोलीस स्टेशन गाडगेनगर - यातील फिर्यादी चंदन हनुमानप्रसाद तिवारी वय ३३ वर्षे धंदा कॅटीन रा सुरक्षा कॉलनी हनुमान मंदीराजावळ तपोवन अमरावती यांची तपोवन गेटवर चहा कॅटीन असून ती चालवून ते परीवाराचा उदरनिर्वाह करतात काल दि ०३.०१.२०२३ रोजी नसरुददीन पठाण याने फीची सुन हीला छेडखानी केल्याने फीने त्याचेविरुध्द पोस्टे ला तक्रार दिली होती आज दि ०४.०१.२०२३ रोजी सकाळी फी हे ०५.०० वा पासून कॅटीन वर आले व ११.०० वा चे सुमारास मेघरीयाम दुबे व फी असे कॅटीन वर असताना सोनू पठाण हा तेथे आला व म्हणाला की, पोलीसवाले अपना कुछ नही बिघाड सकते, ऐसे रिपोर्ट बहोत देख लिए, अपन इंदला के पठाण है, .... के सब चलते अपने को , जमानत पे बाहर आउगा तो देख लुगा सबको अशा भाषेत धमक्या दिल्या व तेथून निघून गेला अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन दि ०४-०१-२०२३ वा चे १८-१५ वा सदरचा गुन्हा दाखल केला.

९. पोलीस स्टेशन राजापेठ - यातील फिर्यादी सर तर्फे नरेश कुमार विजयकुमार मुंढे वय ३३ वर्ष पोलीस उपनिरिक्षक गुन्हे शाखा अमरावती दि ४/१/२३ चे १७.०० वा ते १७.३० वा दरम्यान आरोपी नामे चेतन अरविंद चांगोले याचेवर फिर्यादी यांनी त्यांचे स्टॉंपसह दर्शना PUC सेन्टर समोर बडनेरा कडुन राजापेठ कडे येणारा रोड अमरावती येथे पंचासमक्ष प्रोव्हीशन रेड केली असता आरोपीच्या ताब्यामध्ये देशी दारू बाँबी संत्राच्या १८० मिली च्या ५ बॉक्, मध्ये एकुण २४० पावट्या प्रत्येकी ८० रू. प्रमाणे १९,२०० रू. व चारचाकी वाहण MH ३१ AG ७१४४ SANTRO LS या पांढऱ्या रंगाचे कि. अं. ५०,०००/- रू. असा एकुण ६९,२००//- रू. किंमतीचा माल जप्त करून दि ०४/०१/२३ चे १९.१६ वा गुन्हा दाखल केला.

१०. पोलीस स्टेशन बडनेरा - नितीन हरीभाऊ सुलताने, वय ३२ वर्षे, रा. पुर्णा नगर, ता. भातकुली, अमरावती हे अंजनगाव बारी येथे नातेवाईकांकडे आले होते त्यांना हार्ट अटँक आल्याने उपचाराकरिता जिल्हा सामान्य रूग्णालय, अमरावती येथे नेले असता डॉक्टरांनी त्यांची तपासणी करून मृत घोषीत केले. प्राप्त इर्विन मेमो वरून सदरचा मर्ग दाखल करून तपासात घेतला.

**११. पोलीस स्टेशन नांदगांव पेठ -** यातील फिर्यादी अंकुश बाळासाहेब वानखडे वय ३६ वर्षे धंदा शेती रा. खानापुर नांदगावपेठ यांनी पोस्टे ला रिपोर्ट दिला की फि चे वडील बाळासाहेब रामदासराव वानखडे वय ५८ वर्षे रा. खानापुर नांदगापेठ हे शेती व्यवसाय करीत असुन त्यांच्या शेता मध्ये सोयाबीन आणी कापुस लावलेला होता शेतात सुरवाती पासुनच पिक चांगले न आल्याने तसेच वडिलांचे नावावर को-ऑपरेटीव सोसायटीचे ९०००० रु कर्ज होते तसेच अतिवृष्टी मुले शेतातील पीक चांगले न आल्याने ते कर्ज फेडीच्या चिंतेत असायचे यातील लहान भाउ गोकुळ बाळासाहेब वानखडे हा दि ०४/०१/२०२३ रोजी घरी असता त्याने घराचे दार लोटुन आत पाहीले असता टिनाच्या शेडच्या लोखंडी एँगलला नायलनच्या दोरीने गळफास घेतलेला दिसता अशा पि यांचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल केला.

**१२. पोलीस स्टेशन खोलापूरी गेट -** दिनांक ०४.०१.२०२३ रोजी WLASI निर्जला ब, नं ९३४ यांची ड्युटी सुरु असता पो. स्टे अजनी नागपुर शहर येथुन जा क्र ९९९/२०२२ पो. स्टे टपालाने मर्ग क्र ००/२०२२ कलम १७४ जा फौ प्रमाणे दाखल मर्गाची तपास डायरी पो. स्टे ला प्राप्त झाली असुन सदर मर्ग डायरीचे अवलोकन केले असता यातील मृतक नामे श्रीकृष्ण रमेश थोरात वय ३५ वर्ष रा अजनी ता नांदगाव खंजेश्वर पो. स्टे लोणी दि. अमरावती हा कंपोस्ट डेपो लसनापुर अमरावती येथे बांधकामाचे काम करीत असतांना JCB मशीनचे पुढील फावड्या वरुन खाली उडी मारल्याने मानेवर मार लागल्याने उपचारा करीता इर्वीन येथे भरती असतांना त्यास पुढील उपचारासाठी मेडीकल हॉस्पीटल नागपुर येथे रेफर केले तो दिनांक २७.१२.२०२२ रोजी उरचारा दरम्यान सकाळी ०९.०० वा मरण पावला सदरचे घटनास्थळ पो. स्टे खोलापुरी गेट हद्दीत येत असल्याने मर्ग चे तपासकामी पो. स्टे ला मर्ग दाखल केला.

**१३. पोलीस स्टेशन खोलापूरी गेट -** दिनांक ०४.०१.२०२३ रोजी शैलेश वसंतराव बडोणे वय ५० वर्ष रा यावली शहीद पो. स्टे माहुली अमरावती यांनी समक्ष पोलीस स्टेशनला येवुन जबानी रिपोर्ट दिला की ते वरील ठिकाणी परीवारासह राहतो त्यांचे सासरे प्रभाकर विश्रामजी वर्धेकर वय ७७ वर्ष हे त्यांनी मुलगी त्यांची पत्नी यांचे सह हनुमान नगर येथे राहत होते ते काही काम धंदा करीत नसुन दारु पिण्याचे आधीन होते आज दिनांक ०४.०१.२०२३ रोजी अक्कड सासु रा हनुमान नगर अमरावती यांनी मला फोन व्दारे माहीती दिली की फिर्यादीचे बाबा प्रभाकर वर्धेकर यांनी घरात गळफास घेतल्याने ते मरण पावले आहेत तसेच आम्ही हनुमन नगर येथे माझे सास-या कडे आलो तर समजले की यांना उर्वीन दवाखाना येथे नेले आहे. फिर्यादीचे सासरे यांना दारु पिण्याचे व्यसन होते त्यातच त्यांनी गळफास घेवुन आत्महत्या केली असावी अशा रिपोर्ट वरून सदरचा मर्ग दाखल केला.